(निवडणूक प्राथम्य )

"ड" वर्ग महानगरपालिकांची प्रभाग रचना व आरक्षण करण्यासंदर्भातील अधिकार संबंधित विभागीय आयुक्त यांना प्रदान करण्याबाबत.

# राज्य निवडणूक आयोग,महाराष्ट्र

क्रमांक- रानिआ/मनपा- २०२५/प्र.क्र.७/का-५,
नवीन प्रशासकीय भवन, मादाम कामा रोड,
हुतात्मा राजगुरू चौक, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक : १६ जून, २०२५.
ई-मेल: sec.corp@mah.gov.in

संदर्भ: नगर विकास विभागाचे आदेश क्र.एमसीओ-२०२५/प्र.क्र.२४२/नवि-१४ दि.१० जून,२०२५.

## आदेश

**ज्याअर्थी,** सन २०२२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१, दिनांक ११.०३.२०२२, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ मधील कलम ५ पोट-कलम (३) मधील तरतुदीनुसार पालिका सदस्यांच्या निवडणूकीच्या प्रयोजनासाठी प्रत्येक शहर ज्या प्रभागात विभागले जाईल त्या प्रभागांची संख्या व सीमा राज्य शासन, राज्य निवडणूक आयुक्तांच्या मान्यतेने शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे वेळोवेळी विनिर्दिष्ट करील अशी तरतूद करण्यात आली आहे.

**आणि ज्याअर्थी,** सन २०२२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४३, दि.०८.०९.२०२२ अन्वये महानगरपालिकेमध्ये निवडून द्यावयाच्या सदस्यांची किमान व कमाल संख्या निश्चित करण्यात आलेली आहे.

**आणि ज्याअर्थी,** सन २०२४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २३, दि.१८.०३.२०२४ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम ५ मध्ये महानगरपालिकांच्या सार्वत्रिक निवडणुकांच्या बाबतीत, प्रत्येक प्रभागातून शक्य असेल तेथवर चार पालिका सदस्य, परंतु तीनपेक्षा कमी नाहीत व पाचपेक्षा अधिक नाहीत एवढे पालिका सदस्य निवडून देण्यात येतील अशी तरतूद करण्यात आली आहे.

**आणि ज्याअर्थी**, मा. सर्वोच्च न्यायालयाने विशेष अनुमती याचिका क्र.१९७५६/२०२१ मध्ये दि.०६ मे, २०२५ रोजी दिलेल्या आदेशानुसार स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका तात्काळ घेणे आवश्यक असून सदर निवडणुका या याचिकेतील निर्णयाच्या अधीन राहणार आहेत.

**आणि ज्याअर्थी**, महानगरपालिकांच्या निवडणूक प्रक्रीयेमध्ये (१) प्रभाग रचना करणे व आरक्षण ठरविणे, (२) विधानसभा मतदार यादीचे प्रभागनिहाय विभाजन करणे आणि (३) प्रत्यक्ष निवडणूक घेणे अशा तीन प्रमुख टप्प्यांचा समावेश होतो व या तिन्ही टप्प्यांच्या प्रक्रियेमध्ये विविध उप-टप्पे आहेत.

**आणि ज्याअर्थी**, महानगरपालिकांच्या निवडणुकीसंदर्भातील विविध टप्पे व उप-टप्पे पूर्ण करण्याकरिता लागणारा कालावधी व मा. सर्वोच्च न्यायालयाचे उपरोक्त निर्देश विचारात घेता निवडणुकांची प्रक्रिया तात्काळ सुरू करणे आवश्यक असून, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील उपरोक्त सुधारणांना अनुसरून निवडणुकांकरीता प्रभाग रचना करण्याबाबत शासनाने संदर्भाधिन आदेशान्वये प्रभाग रचना करण्यासंदर्भातील शासनाचे अधिकार "ड" वर्ग महानगरपालिकांच्या बाबतीत संबधित जिल्हाधिकारी यांना प्रदान केले आहेत.

आणि ज्याअर्थी, "ड" वर्ग महानगरपालिकांची प्रभाग रचना व आरक्षण ही प्रक्रिया विहित वेळेत पूर्ण करुन निवडणुका तात्काळ घेण्याकरीता राज्य निवडणूक आयोगाचे अधिकार प्रदान करणे आवश्यक झाले आहे.

**त्याअर्थी**, भारतीय संविधानाच्या २४३ झेडए व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ च्या कलम १४ मधील अधिकारांचा व इतर प्राप्त अधिकारांचा वापर करून राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र हे महानगरपालिका अधिनियमाच्या कलम ५(३) व कलम ५अ मधील तरतुदी अंतर्गत खालील "ड" वर्ग महानगरपालिकांच्या सार्वत्रिक निवडणुकांकरीता सदस्य संख्या नमूद करुन प्रभाग रचना करणे व आरक्षण निश्चित करणे इत्यादीचे, राज्य निवडणूक आयोगाचे अधिकार संबंधित विभागीय आयुक्त यांना प्रदान करण्यात येत आहेत.

| "ड" वर्ग महानगरपालिकांची नांवे | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १. | अमरावती महानगरपालिका | ८. | उल्हासनगर महानगरपालिका | १५. | चंद्रपूर महानगरपालिका |
| २. | अहिल्यानगर महानगरपालिका | ९. | भिवंडी-निजामपूर महानगरपालिका | १६. | परभणी महानगरपालिका |
| ३. | अकोला महानगरपालिका | १०. | जळगांव महानगरपालिका | १७. | पनवेल महानगरपालिका |
| ४. | कोल्हापूर महानगरपालिका | ११. | नांदेड-वाघाळा महानगरपालिका | १८. | इचलकरंजी महानगरपालिका |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ५. | सोलापूर महानगरपालिका | १२. | धुळे महानगरपालिका | १९. | जालना महानगरपालिका |
| ६. | सांगली-मिरज-कुपवाड महानगरपालिका | १३. | मालेगांव महानगरपालिका | | - |
| ७. | मिरा-भाईंदर महानगरपालिका | १४. | लातूर महानगरपालिका | | - |

संबंधित विभागीय आयुक्त यांना आपले अधिकार त्यांच्या अधिपत्याखालील अधिकाऱ्यांना प्रत्यार्पित करता येणार नाहीत.

या निवडणुकांचे कामकाज पार पाडतांना लोकसभा व विधानसभा निवडणुकांप्रमाणे सर्व काळजी व दक्षता घेणे आवश्यक आहे. ही जबाबदारी पार पाडताना निवडणुकांचे पावित्र्य राखणे आणि निवडणूक प्रक्रिया मुक्त, न्याय्य व पारदर्शक रितीने पार पडेल हे संबंधित विभागीय आयुक्त व महानगरपालिका आयुक्त यांनी पहाणे अत्यंत आवश्यक आहे.

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार.

१८.०६.२०१५

(सुरेश काकाणी)
सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

प्रत :-

१. अपर मुख्य सचिव, नगर विकास विभाग,(नवि-२).मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
२. सर्व विभागीय आयुक्त.
३. सर्व जिल्हाधिकारी.
४. सर्व महानगरपालिका आयुक्त ("ड" वर्ग).
५. मा. सर्वोच्च न्यायालय व मा. उच्च न्यायालयातील राज्य निवडणूक आयोगाचे वकील
६. मा.आयुक्त व सचिव, राज्य निवडणूक आयोग यांचे स्वीय सहायक.
७. राज्य निवडणूक आयोगातील सर्व कार्यासने.
८. निवड नस्ती.